# तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी यांचे कार्यालय औंढा ना.

## (आस्थापना विभाग)

E-Mall :- tahaundha१२३@gmail.com ph.No.०२४५६-२६००४७

जाहिरात क्रं.०१/२०२३/आस्था/ कावी दिनांक : २१.०७..२०२३

प्रति,
मा. उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय, लातूर

**विषय :- कोतवाल भरती-२०२३**
भरतीची जाहिरात वृत्तपत्रात प्रसिध्द करणे बाबत .

**संदर्भ** :- मा.जिल्हाधिकारी ,हिंगोली यांचे कार्यालयीन पत्र दि.१९.०७.२०२३

**महोदय ,**

उपरोक्त विषयी संदभीय पत्रान्वये कोतवाल पदभरती प्रक्रिया २०२३ साठी कालबध्द कार्यक्रम निश्चित करण्यात आला असून कोतवाल पदभरती करण्याबाबत सुचीत करण्यात आले असल्याने तहसिल कार्यालय, औंढा नागनाथ अंतर्गत कोतवाल पद भरती करावयाचे आहे.

त्यानुषंगाने आपणास कळविण्यात येते की, यासोबत आपणास कोतवाल पद भरती तालूका औंढा नागनाथ ची जाहिरात पाठविण्यात येत असून सदर कोतवाल पदभरतीची जाहिरात हिंगोली जिल्यातील नामांकित वृत्तपत्रात दिनांक २४.०७.२०२३ रोजीच्या अंकात प्रसिध्दी करण्यात यावी, ही विंनती.

**सोबत** :- कोतवाल रिक्त पदांचा तपशिल

आपला विश्वासु

(विठ्ठल परळीकर)
तहसिलदार, औंढा ना

**प्रतिलिपी ,**

१. मा.जिल्हाधिकारी ,हिंगोली यांना माहितीस्तव सविनय सादर .
२. मा. उपविभागीय अधिकारी, वसमत यांना माहितीस्तव सविनय सादर .

(विठ्ठल परळीकर)
तहसिलदार, औंढा ना

कोतवाल भरती 2023.

Scanned with OKEN Scanner

# तालूका निवड समिती, औंढा (ना) जि. हिंगोली

## कोतवाल पदाची सरळ सेवा भरती निवड प्रक्रिया - 2023

जाहिरात क्रमांक-1/2023/आस्थापना/कोतवाल भरती/कावि - दिनांक 24.07.2023

# * जाहिरात *

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक केओटी-2012/प्र.क्र.432/ई-10 दिनांक 5 सप्टेंबर 2013 व शासन निर्णय क्र.संकीर्ण-2023/प्र.क्र.17/ई-10 दिनांक 17.05.2023 अन्वये व शासन निर्णय क्रमांक पीकेए 1059/ VI-L,बॉम्बे सरकार, सचिवालय, बॉम्बे दिनांक 07.05.1959 कोतवाल सेवाप्रवेश नियमानुसार कोतवालाची रिक्त पदे भरती करणे बाबंत आदेशित करण्यात आल्यामुळे मा.जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र.2023/अ-2/आस्था-4/कावी, दिनांक 19.07.2023 अन्वये तहसीलदार, औंढा (ना) यांचे आस्थापनेवरील अवर्गीकृत कोतवाल संवर्गांमधील मा. विभागीय आयुक्त (मावक) विभाग, औरंगाबाद यांचे बिंदू नामावली तपासणी अहवाल जा.क्र.2023/मावक/कक्ष-2/सिआर-197/कावी, दिनांक 03.07.2023 नुसार रिक्त सज्जाची पदे भरण्याकरिता खालील प्रमाणे प्रवर्गनिहाय उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**कोतवाल रिक्त पदांचे आरक्षण**

**( मासिक एकत्रित मानधन रुपये 15000/- )**

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | महिला | समांतर आरक्षणाशिवाय भरावयाची पदे | एकुण भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|
| 1 | अनुसुचित जाती | 0 | 01 | **01** |
| 2 | अनुसुचित जमाती | 0 | 01 | **01** |
| 3 | विमुक्त जाती (अ) | 0 | 0 | **0** |
| 4 | भटक्या जमाती (ब) | 0 | 0 | **0** |
| 5 | भटक्या जमाती (क) | 0 | 01 | **01** |
| 6 | भटक्या जमाती (ड) | 0 | 01 | **01** |
| 7 | विशेष मागास प्रवर्ग | 0 | 0 | **0** |
| 8 | इतर मागास प्रवर्ग | 01 | 01 | **02** |
| 9 | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | 0 | 01 | **01** |
| 10 | खुला | 01 | 02 | **03** |
| | **एकुण** | **02** | **08** | **10** |

टिप : 1. पदाच्या एकूण संख्येमध्ये व आरक्षणात वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.

2. महिलांसाठी आरक्षित पदावर महिला उमेदवार न मिळाल्यास शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग यांचे निर्णय दिनांक 25.05.2001 अन्वये त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधून सदर पदे भरण्यात येतील.

Scanned with OKEN Scanner

अटी व शर्ती

1. **शैक्षणिक अर्हता :**

1.1. उमेदवार किमान इयत्ता चौथी उत्तीर्ण असावा.

1.2. उमेदवारास मराठी भाषा लिहिता व वाचता येणे आवश्यक आहे.

2. **वयोमर्यादा :**

2.1. दिनांक 07/08/2023 रोजी उमेदवाराचे वय वर्षे 18 ते 40 दरम्यान असावे.

2.2. कोतवाल हे पद वर्ग एक ते चार संवर्गात मोडत नाही व सदरील पद हे अवर्गीकृत असल्यामुळे दिव्यांग, प्रकल्प / भूकंपग्रस्त, अंशकालीन, खेळाडू, माजी सैनिक इत्यादीसाठी देण्यात आलेली वयोमर्यादेतील शिथीलता व आरक्षण कोतवाल भरतीसाठी लागू असणार नाही.

3. उमेदवार हा औंढा (ना) तालूक्यातील रहिवाशी असणे आवश्यक आहे.

4. निवड झालेल्या उमेदवारांनी शारिरीक क्षमतेबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे लागेल व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

5. या जाहिराती अन्वये करण्यात येणारी भरती संपूर्ण तालूका हा एक घटक गृहीत धरून करण्यात येत असल्यामुळे निवड होणाऱ्या उमेदवारांच्या नियुक्तीसाठी त्यांच्या राहण्याच्या ठिकाणांचा कोणताही विचार न करता तालूका अंतर्गत रिक्त असलेल्या कोणत्याही ठिकाणी पदस्थापना देण्यात येईल व तालूका अंतर्गत बदलीस पात्र राहतील. त्याकरिता उमेदवारांने रुपये 100 चे बंधपत्र देणे आवश्यक आहे.

6. उमेदवारांची नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपाची राहील.

7. कोतवाल हे पद अवर्गीकृत असल्यामुळे सेवानिवृत्ती विषयक लाभ मिळणार नाहीत.

8. मागासवर्गीय उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. निवड होणाऱ्या मागासवर्गीय घटकातील उमेदवारांनी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक 2011/प्र.क्र. 1064/2011/16-ब दिनांक 12.12.2011 अन्वये संबंधित उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती दिली जाईल. जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्याच्या आत सादर करण्याच्या अटीवर बंधपत्र/शपथपत्र लिहून दिल्यानंतर विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याची सेवा संपुष्टात येईल.

9. अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती वगळून अन्य प्रवर्गातील मागासवर्गीय उमेदवारासाठी चालु आर्थिक वर्षात वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत साक्षांकित करून आवेदन पत्रासोबत जोडावी. (नॉन क्रिमीलेअर चे तत्व अनुसूचित जाती /जमाती या प्रवर्गा व्यतिरिक्त अन्य सर्व मागास प्रवर्गांना लागू राहील).

10. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील उमेदवारांकरीता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक राआधो-4019/प्र.क्र.31/16-अ दिनांक 12.02.2019 व दिनांक 31.05.2021 अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

11. कोतवाल पदावर निवड झाल्यानंतर रु.100/- च्या बॉड पेपरवर विहीत नमुन्यात 2 जामीन तसेच संबंधित सज्जा अंतगत गावात राहणेबाबत हमीपत्र दयावे लागेल.

Scanned with OKEN Scanner

**12. महिला उमेदवाराकरीता :**

12.1. महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय दिनाक 04.05.2023 अन्वये खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.

12.2. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छीणा-या महिलांना त्या त्यां मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडुन वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**13. परीक्षा शुल्क सदर परिक्षेकरिता खालील प्रमाणे शुल्क राहील.**

13.1. मागासवर्गीय उमेदवाराकरिता 400/- रुपये.

13.2. खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरिता 600/- रुपये.

वरील प्रमाणे परीक्षा शुल्क **तहसिलदार, औंढा (ना)** या नावाने राष्ट्रीयकृत बँकेचे डी.डी. ( डिमांड ड्राफ्ट ) अर्जासोबत सादर करावा.

( परीक्षा शुल्क बँक प्रोसेसिंग चार्जेस तसेच त्यावरील देय कर वगळून आहेत. )

13.3. परीक्षा शुल्क ना-परतावा ( Non-Refundable ) राहील.

**14. निवड पद्धती :**

14.1. महसुल व वनविभाग शासन निर्णय दिनांक 17.05.2023 नुसार 100 गुणांची लेखी परीक्षा असेल. लेखी परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाचे 50 प्रश्न असतील दिनांक 27.08.2023 रोजी सकाळी 11 ते 12.30 दरम्यान प्रवेश पत्राद्वारे कळविण्यात आलेल्या ठिकाणी घेण्यात येईल.

14.2. गुणवत्ता क्रम हा लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारावर म्हणजेच एकूण 100 गुणांपैकी मिळालेल्या गुणांच्या आधारावर राहील.

14.3. लेखी परीक्षेत सामान्य ज्ञान, अंकगणित, मराठी व जिल्ह्याची भौगोलिक माहिती यांचा समावेश राहील.

14.4. लेखी परीक्षेत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्ता धारण करणाऱ्या उमेदवारांना मूळ कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर अंतिम निवड यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

14.5. समसमान गुण असल्यास दिनांक 27.06.2008 चे शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

14.6. निवड करण्यात आलेले उमेदवार निवड झाल्यापासून 15 दिवसाच्या आत रुजू न झाल्यास प्रतिक्षाधिन यादी मधील दुसरे उमेदवार यांची नियुक्ती करण्यात येईल.

**15. अर्ज कसा करावा :**

15.1. सदर पदासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना तहसील कार्यालय, औंढा (ना) येथे रुपये 50/- शुल्क भरुन उपलब्ध होईल.

15.2. जाहिराती सोबत प्रसिद्ध करण्यात येत असलेल्या विहित नमुन्यातील अर्ज त्यामधील माहिती / तपशील सुस्पष्टपणे नमूद करून सादर करावा.

Scanned with OKEN Scanner

15.3. अर्जासोबत स्वतःचे नाव व पत्ता नमूद केलेला व रुपये 5/- चे पोस्टाचे तिकीट लावलेला लिफाफा जोडावा.

15.4. उमेदवाराने त्यांचे अलीकडील काळातील छायाचित्र आवेदन पत्रावर विहित जागी स्वसाक्षांकित करून घट्ट चिटकावे.

15.5. शैक्षणिक अर्हतेच्या प्रमाणपत्राच्या स्वसाक्षांकित प्रती अर्जासोबत जोडाव्यात. मुळ कागदपत्रे अर्जासोबत जोडू नये.

15.6. मागासवर्गीय उमेदवाराने अर्जासोबत जातीच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत स्वसाक्षांकित करून जोडावी.

15.7. अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती व्यतिरिक्त सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नतं व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे चालु आर्थिक वर्षात वैध असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी.

15.8. महाराष्ट्र राज्याचे अधिवास ( Domicile ) प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

15.9. अर्जासोबत लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे.

16. **अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख व कार्यालयाचा पत्ता :**

16.1. उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज सहपत्रासह तहसील कार्यालय, औंढा (ना) येथे समक्ष अथवा पोस्टाने दिनांक 25.07.2023 ते दिनांक 07/08/2023 या कालावधीत ( सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळुन ) कार्यालयीन वेळेत पोहोचतील अशा बेताने दाखल करावेत.

16.2. विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व त्यासाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच त्याबावत वेगळयाने पत्र व्यवहार केला जाणार नाही.

17. विहीत नमुन्यातील नसलेले अर्ज, विहित शुल्क भरना न केलेले उमेदवाराचे अर्ज, विहित शैक्षणिक अहर्ता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, अपूर्ण व चुकीचे भरलेले अर्ज, फोटो नसलेला व स्वसाक्षांकित न केलेला अर्ज आणि विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

18. या जाहिरातीला अनुसरून ज्या उमेदवाराचे अर्ज विहीत कालावधीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवाराचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी शासनाकडे, जिल्हाधिकारी कार्यालयास, उपविभागीय कार्यालयास किंवा तहसील कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

19. अर्जासोबत कुठल्याही राजकीय पक्षाची शिफारस जोडलेली नसावी, असे आढळुन आल्यास सदरील अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. तसेच संपुर्ण निवड प्रक्रीये दरम्यान कुठलाही दबाव आणल्यास संबंधितास निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.

20. प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी अंती पात्र / अपात्र उमेदवारांच्या यादी तहसील कार्यालय, औंढा (ना), मा.उप विभागीय अधिकारी, वसमत आणि मा.जिल्हाधिकारी हिंगोली यांचे कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://hingoli.gov.in तेथील नोटीसबोर्डावर प्रसिद्ध करण्यात येईल. पात्र असलेल्या उमेदवारांना परीक्षेचे स्थळ व वेळ प्रवेशपत्राद्वारे लेखी स्वरूपात कळविण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

21. लेखी परीक्षेसाठी उमेदवारांनी प्रवेश पत्रावरील दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

22. ज्या उमेदवारांना पोस्टाने प्रवेश पत्रे प्राप्त झाले नाहीत अशा उमेदवारांनी ठरवून दिलेल्या कालावधीत तहसील कार्यालय, औंढा (ना) येथून प्रवेश पत्र हस्तगत करावीत.

23. **उत्तर तालिका** :

24. उत्तर तालिका तहसील कार्यालय, औंढा (ना), मा.उप विभागीय अधिकारी, वसमत आणि मा.जिल्हाधिकारी हिंगोली कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळावर http://hingoli.gov.in व तेथील नोटीसबोर्डावर प्रसिद्ध करण्यात येईल.

25. लेखी परीक्षेचा निकाल उमेदवारांच्या आसन क्रमांकाची यादी तहसील कार्यालय, औंढा (ना), मा.उप विभागीय अधिकारी, वसमत आणि जिल्हाधिकारी, हिंगोली कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळावर http://hingoli.gov.in व तेथील नोटीसबोर्डावर प्रसिद्ध करण्यात येईल.

26. अंतिम निवड झालेल्या उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी उपविभागीय अधिकारी कार्यालय, वसमत येथे होईल. मूळ कागदपत्रांची पडताळणीत पात्र उमेदरांचीच निवड वैध समजण्यात येईल. कागदपत्रे पडताळणी नंतरच अंतिम निवड यादी तहसील कार्यालय, तहसील कार्यालय, औंढा (ना), मा. उप विभागीय अधिकारी, वसमत आणि मा. जिल्हाधिकारी हिंगोली कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://hingoli.gov.in व तेथील नोटीसबोर्डावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**27. कोतवाल भरतीचा कालबदध्द कार्यक्रम खालील प्रमाणे :**

| अ.क्र. | बाब | कालावधी (दिनांक) | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | अर्ज दाखल करणे | दिनांक 25.07.2023 ते दिनांक07.08.2023 (सार्वजनिक सुटीचे दिवस वगळुन) | कार्यालयीन वेळेत | तहसिल कार्यालय, औंढा (ना) |
| 2 | लेखी परीक्षेसाठी पात्र/अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दिनांक 10.08.2023 | कार्यालयीन वेळेत | 1 .तहसिल कार्यालय, औंढा (ना)<br>2. मा.उपविभागीय अधिकारी कार्यालय, वसमत<br>3.मा.जिल्हाधिकारी हिंगोली कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://hingoli.gov.in प्रसिध्द करण्यात येईल. |
| 3 | ज्यांना प्रवेशपत्र पोष्टाने प्राप्त झाले नाहीत अशा उमेदवारांना तहसील कार्यालयातुन प्रवेशपत्र देणे | दिनांक 24.08.2023 व दिनांक 25.08.2023 | कार्यालयीन वेळेत | तहसिल कार्यालय, औंढा (ना) |
| 4 | लेखी परीक्षा | दिनांक 27.08.2023 | सकाळी 11 ते 12.30 | प्रवेश पत्राद्वारे पोष्टाने कळविण्यात येईल. |

Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | प्राथमिक उत्तरतालिका प्रसिध्द करणे | दिनांक 29.08.2023 | कार्यालयीन वेळेत | 1. तहसिल कार्यालय, औंढा (ना)<br>2. मा.उपविभागीय अधिकारी कार्यालय, वसमत<br>3. मा. जिल्हाधिकारी हिंगोली कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://hingoli.gov.in प्रसिध्द करण्यात येईल. |
| 6 | प्राथमिक उत्तरतालिका प्रसिध्द झाल्यानंतर त्यावर काही आक्षेप / हरकती असल्यास त्या सादर करणे. | दिनांक 30.08.2023 ते दिनांक 31.08.2023 | कार्यालयीन वेळेत | तहसिल कार्यालय, औंढा (ना) |
| 7 | अंतिम उत्तरतालिका प्रसिध्द करणे | दिनांक 01.09.2023 | कार्यालयीन वेळेत | 1 .तहसिल कार्यालय, औंढा (ना)<br>2. मा.उपविभागीय अधिकारी कार्यालय, वसमत<br>3. मा. जिल्हाधिकारी हिंगोली कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://hingoli.gov.in प्रसिध्द करण्यात येईल. |
| 8 | लेखी परीक्षेतील गुणवत्ता क्रमानुसार पात्र उमेदवारांची अटी व शर्तीच्या अधिन राहुन तात्पुरती यादी प्रसिध्द करणे | दिनांक 04.09.2023 | कार्यालयीन वेळेत | 1 .तहसिल कार्यालय, औंढा (ना)<br>2. मा.उपविभागीय अधिकारी कार्यालय, वसमत<br>3. मा. जिल्हाधिकारी हिंगोली कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://hingoli.gov.in प्रसिध्द करण्यात येईल. |
| 9 | मुळ कागदपत्रांची पडाताळणी | दिनांक 05.09.2023 | कार्यालयीन वेळेत | मा. उपविभागीय अधिकारी कार्यालय, वसमत. |
| 10 | अंतीम निवड यादी प्रसिध्द करणे | दिनांक 08.09.2023 | कार्यालयीन वेळेत | 1 .तहसिल कार्यालय, औंढा (ना)<br>2. मा. उपविभागीय अधिकारी कार्यालय, वसमत<br>3. मा. जिल्हाधिकारी हिंगोली कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://hingoli.gov.in प्रसिध्द करण्यात येईल. |

Scanned with OKEN Scanner

28. काही प्रशासकीय अथवा तांत्रिक अडचण उद्भवल्यास निवड प्रक्रिया स्थगित, अंशतः बदल किंवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार निवड समितीस राहतील.

29. उमेदवारांनी उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याला अपात्र ठरवून त्याची उमेदवारी भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

30. अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारणा केली म्हणजे लेखी परीक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही.

31. लेखी परीक्षा व कागदपत्रे पडताळणीसाठीचा प्रवास खर्च उमेदवाराला स्वतः करावा लागेल.

32. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

33. वरील अटी व शर्ती, नियमाव्यतिरिक्त शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश व शासन निर्णय लागु राहतील.

34. सदर जाहिरात विस्तृत व सविस्तरपणे व अर्जाचा नमुना तहसील कार्यालय, औंढा (ना), मा. उप विभागीय अधिकारी, वसमत आणि मा.जिल्हाधिकारी हिंगोली कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://hingoli.gov.in व तेथील नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.

35. सदर जाहिरात विस्तृत व सविस्तरपणे व अर्जाचा नमुना http://hingoli.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

36. वरील नमुद जाहीरातीमध्ये / वेळापत्रकामध्ये / निवडप्रक्रियेमध्ये बदल झाल्यास त्याबाबतची माहीती तहसिल कार्यालय, औंढा (ना) व उपविभागीय कार्यालय, वसमत येथील नोटीस बोर्डवर तसेच मा.जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली यांचे http://hingoli.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**दिनांक : 24.07.2023**

**स्थळ : औंढा (ना)**

**( विठ्ठल माधवराव परळीकर )**
**तहसिलदार, औंढा (ना)**
**तथा सदस्य सचिव,**
**तालुका निवड समिती, औंढा (ना)**

**( डॉ.सचिन खल्लाळ )**
**उप विभागीय अधिकारी वसमत**
**तथा अध्यक्ष,**
**तालुका निवड समिती, औंढा (ना)**

Scanned with OKEN Scanner